राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - ७४/२०२१/जळगांव

१ श्री. संदीप भगवान पाटील, : अपिलार्थी
रा. मु. सुसरी,
ता. भुसावळ, जि. जळगांव-४२५३०५.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
मुख्यालय सहायक,
उप अधिक्षक, भुमी अभिलेख यांचे कार्यालय,
भुसावळ, जि. भुसावळ, जि. जळगांव.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप अधिक्षक,
उप अधिक्षक, भुमी अभिलेख यांचे कार्यालय,
भुसावळ, जि. भुसावळ, जि. जळगांव.

ऑनलाईन सुनावणी दिनांक - ०७/०७/२०२२

अपिलार्थी यांनी दिनांक ०२/०१/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन कोणतीही माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची दिनांक ०७/०७/२०२२ रोजी meet.google.com/ggw-pjjj-esi या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन आयोजित करण्यात आली होती.

सुनावणीसाठी उपस्थित- सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दिनांक ०७/०४/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये सन १९५० ते सन २०२० या कालावधीतील विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गावाचा नकाशा याबाबत पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती. १) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गावांचा सदर ब्रिटीश कालीन १९२० ते १९५० दरम्यानचा शेती शिवाराचा संपुर्ण नकाशा व स्केल ची सत्यप प्रत सहि शिक्यानिशी, २) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गट नंबर ६५७ (जुना सर्व्हे नंबर २५३) चे जमीन एकत्रीकरण करतेवेळी चे नकाशे व अधिचे घेण्यात आलेल्या टिपनाचे नकाशे व मोजणी अधिकारी यांचा अहवाल सह शेरा, ३) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गट नंबर ६४९ चे जमीन एकत्रीकरण करतेवेळी चे नकाशे व अधिचे घेण्यात आलेल्या टिपनाचे नकाशे व मोजणी अधिकारी यांचा अहवाल सह शेरा, ४) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गट नंबर ६५७ (जुना सर्व्हे नंबर २५३) चे सन १९५० ते सन २०२० पर्यंत मोजणी/गट विभागणी मोजणी करण्याच्या मोजणीच्या तारीखसह नकाशा किंवा मोजणी स्थगिती करण्यात आलेल्या आदेशाची प्रत तारीख ०७/०४/२०२० पर्यंत मिळण्याबाबत, ५) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गट नंबर ६४९ चे सन १९५० ते सन २०२० पर्यंत मोजणी/पोट विभागणी मोजणी करण्यात आलेली असल्याने मोजणीच्या तारीखसह

नकाशा किंवा मोजणी स्थगिती करण्यात आलेल्या आदेशाची प्रत, ६) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गट नंबर ६५० (जुना सर्व्हे नंबर २५४) चे टीपन उतारा/नकाशा व जमीन एकत्रीकरण करतेवेळी व आधिचे घेण्यात आलेल्या टीपनाचे नकाशे व मोजणी अधिकारी यांचा अहवाल शेरासह तसेच ७) मौजे-विल्हाळे (लोणवडी उजाळ गांव) गट नंबर ६५० (जुना सर्व्हे नंबर २५४) सर्व्हे नंबरचे गट नंबर करतेवेळी तयार करण्यात आलेला नकाशाची प्रत मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना कोणतेही उत्तर दिलेले नाही.

तद्नंतर कोणतेही उत्तर अथवा माहिती न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक १२/०८/२०२० रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक १२/१०/२०२० रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा अभिलेख कक्षात कसुन शोध घेऊन अपिलार्थी यांना १५ दिवसांत विनामुल्य माहिती पुरवावी, असे आदेश देऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०५/११/२०२० रोजी कार्यालयातील उपलब्ध माहिती समक्ष पुरविली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०७/०४/२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही अपुर्ण माहिती पुरविली असल्याचे स्पष्ट होते. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय उपलब्ध नसलेल्या कागदपत्रांबाबत कारणे/वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविणे आवश्यक होते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही स्थायी स्वरुपाची असल्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे, या प्रकरणातील माहिती उपलब्ध नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नसुन माहिती देण्यास टाळाटाळ करण्याची भुमिका स्पष्टपणे दिसुन येते. या प्रकरणी माहिती स्थायी स्वरुपाची असल्याने संबंधित कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती अथवा वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविलेले नाही. प्रथम अपिलाचा निर्णय झाल्यानंतर माहिती उपलब्ध नाही, असे उत्तर दिले आहे. हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नसुन मांहिती देण्यास टाळाटाळ करण्याची भूमिका स्पष्टपणे दिसुन येते. यास्तव तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याबाबत खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच सदरील माहिती ही स्थायी स्वरुपाची असताना देखील संबंधित कार्यालयात माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, ही बाब गंभीर आहे. तरी, उप अधिक्षक भुमी अभिलेख, भुसावळ यांना अधिनियमाच्या कलम १९(८) (क) अन्वये जन माहिती अधिकारी म्हणुन घोषित करणे आवश्यक आहे व त्यांनी सदर माहितीचा पुन्हा एकदा शोध घेऊन, माहितीचा आढळ झाल्यास सदर माहिती अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. परंतु माहिती तरीही प्राप्त न झाल्यास त्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या कायद्यान्वये अभिलेख गहाळ प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेश देणे आयोगास आवश्यक वाटते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(क) अन्वये उप अधीक्षक भुमी अभिलेख, भुसावळ यांना जन माहिती अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्यांनी आदेश प्राप्तीच्या ३० दिवसांच्या आत सदर माहितीचा पुन्हा एकदा शोध घेऊन, माहितीचा आढळ झाल्यास अपिलार्थीस माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. माहिती प्राप्त न झाल्यास त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या कायद्यान्वये अभिलेख गहाळ प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाहीबाबत आवश्यक प्रस्ताव आदेश प्राप्तीच्या ३० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी यांनी सादर करुन त्याची एक प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२) माहिती अर्जाच्या दिनांकास कार्यरत जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक, भुमी अभिलेख यांचे कार्यालय, भुसावळ यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, जळगांव, ता. जि. जळगांव.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी), मुख्यालय सहायक, उप अधिक्षक, भुमी अभिलेख यांचे कार्यालय, भुसावळ, जि. भुसावळ, जि. जळगांव.

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र. ७४/२०२१/जळगांव/ओ - १९०१ दिनांक 20/09/2022